Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# सेनापती संताजी घोरपडे घराण्याचा इतिहास

**बुद्रुक साईनाथ बळीराम**
संशोधक विद्यार्थी
sainath7858@gmail.com
मो : 7709107858

**प्रस्तावना**

घोरपडे घराण्यातील वीर पुरुषांनी आपल्या पराक्रमाच्या बळावर विजापूरच्या आदिलशाहीत निरनिराळ्या ठिकाणची पाटिलकी, देशमुखी अशी वतने मिळविली. पुढे घोरपडे घराण्याच्या दोन शाखा झाल्या. यात बाजी घोरपडे हे मुधोळकर घराण्याचे, तर संताजीचे वडील म्हाळोजी हे कापशीकर घराण्याचे मूळ पुरुष होते. म्हाळोजी त्यावेळी आदिलशहाच्या पदरी होते. त्यांच्याकडे वाई परगण्यातील विटे, भाळवणी, वांगी या गावांची देशमुखी होती. ही वतने त्यांच्याकडे वंशपरंपरेने चालत आली होती. म्हाळोजींचे वास्तव्य भाळवणी येथे होते. विटा-इस्लामपूर मार्गावर विट्यापासून सुमारे १६ कि.मी. अंतरावर भाळवणी हे गाव वसलेले आहे. गावाच्या पश्चिमेला सुमारे २.५ कि.मी. अंतरावरून येरळा नदी वाहते. आजही या गावात 'संताजीचा वाडा' म्हणून एक भग्न वास्तू दाखविली जाते. आज या वास्तूची चार भिंताडे कशीबशी उभी आहेत. त्याचबरोबर येरळा नदीच्या पैलतीरावर वांगी हे गाव आहे आणि त्याच्या पश्चिमेला ‘न्हावी’ हे गाव वसलेले असून या दोन्ही गावांमध्ये घोरपड्यांचा एक-एक वाडा आहे. परंतु वांगी व न्हावी येथील वाड्यांपेक्षा भाळवणी येथील वाडा क्षेत्रफळाने बराच मोठा होता, हे तेथील भग्नावशेषांवरून कळून येते.

घोरपडे आणि भोसले हे दोन्ही घराणे मुळात एकच आहेत. या घराण्यातील प्रथम पुरूष हा लक्ष्मणसिंह म्हणजेच मेवाडचे महाराणा हे होते. लक्ष्मणसिंह यांचे पूत्र अजयसिंह हे होते. राजस्थानमधील उदयपूरच्या सिसोदे घराण्यातील म्हणजेच अजयसिंह यांचे पूत्र सुजनसिंह राणा हे १३३४ साली महाराष्ट्रात औरंगाबाद जवळील देवगिरी परगण्यात आले. हे घराणे शूरवीर व पराक्रमी असल्यामुळे सुजनसिंह यांचे नातू भैरवसिंह ऊर्फ भोसाजी यांना बहामनी सल्तनतीकडून १३९८ साली मुधोळ प्रांतातील ८४ गावांसह वंशपरंपरेने जहागिरी मिळाली. भैरवसिंह यांना भोसाजी म्हटले जात होते. भोसाजीचे पुढे भोसले असे नामकरण झाले, तेव्हापासून सिंह ऐवजी भोसले घराणे म्हणून ओळखले जावू लागले. भैरवसिंहाचे पूत्र राणा देवराज यांना राणा उग्रसेन व प्रतापसिंह असे दोन पूत्र होते. राणा उग्रसेन यांना राणा कर्णसिंह आणि शुभकृष्णसिंह असे दोन लढवये पुत्र होते. हे दोन्ही बंधू बहामनी सल्तनतीत सरदार होते. पुढे राणा कर्णसिंह आणि शुभकृष्णसिंह या दोन्ही बंधूच्या दोन शाखा निर्माण झाल्या. राणा कर्णसिंह म्हणजेच घोरपडे घराणे तर शुभकृष्णसिंह म्हणजे भोसले घराणे म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण झाली. म्हाळोजी ऊर्फ महालोजी घोरपडे

यांना संताजी, बहिर्जी आणि मालोजी हे तीन पूत्र होते. सेनापती संताजी घोरपडे यांना राणोजी व पिराजी हे दोन पूत्र झाले.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. घोरपडे व भोसले घराण्याच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.

२. घोरपडे घराण्याच्या इतिहासाचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी सामाजिक शास्त्रातील ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**कर्णसिंह व पुत्र भीमसिंह घोरपडे**

इ.स.१४६९ मध्ये बहामनी सत्तेतील वजीर महमद गवानने कोकण प्रांत ताब्यात घेण्यासाठी आक्रमणाची योजना आखली होती, या मोहिमेमध्ये कर्णसिंह घोरपडे आणि त्यांचे पुत्र भीमसिंह सामील झाले होते. कोकणस्थित राजा शंकरराय मोरे यांचा 'विशाळगड' हा किल्ला अतिशय दुर्गम आणि अवघड होता. हा किल्ला जिंकणे अशक्य झाले होते. दुर्गम आणि अशक्य वाटणारा किल्ला जिंकण्यासाठी कर्णसिंह व भीमसिंह यांनी घोरपडीच्या कमरेला दोर बांधून घोरपडीना किल्ल्यावर चढविले. घोरपडी किल्ल्याच्या बुरूजावर चडताच दोरीच्या साहाय्याने सर्व सैनिक किल्ल्यात यशस्वीपणे उतरविले. पहारेकऱ्यांना थांग पत्ता न लागता किल्ल्यात सर्व सैनिक येताच किल्याचे दरवाजे बंद करून शंकरराय मोरे यांच्या सैनिकांचा यशस्वी पाडाव करून हा किल्ला कर्णसिंह घोरपडे आणि त्यांचे पुत्र भीमसिंह घोरपडे यांनी जिंकला.

एकंदरीत विशाळगड किल्ल्यावर घोरपडीचा उपयोग करण्यात आल्यामुळे सर्वत्र त्यांना घोरपडे म्हटले जाऊ लागले. पुढे 'भीमसिंह' यांना 'घोरपडे' तर 'भीमसिंहांचे' काका शुभकृष्णसिंह यांना सर्वत्र 'भोसले' म्हटले जाऊ लागले. भीमसिंहांचे वंशज बहामनींच्या दरबारी सरदारकी म्हणून काम पाहत होते.काही कालावधीत बहामनी राजवट नष्ट झाल्यावर विजापूरच्या आदिलशाहीमध्ये घोरपडे घराण्यातील सरदार कार्य बजावीत होते. तर दुसऱ्या बाजूला शुभकृष्ण भोसले घराण्यातील सरदार अहमदनगरच्या निजामशाहीमध्ये कार्यरत होते.

**चोलराज घोरपडे**

विजयनगरच्या बलाढ्य सैन्याचा पाडाव करण्यासाठी इ.स. १५६५ साली तालिकोट येथील इतिहासात प्रसिद्ध असलेल्या लढाईत दक्षिणेतील पाच सुलतानांनी एकत्र येऊन विजयनगरचा पराभव केला. या लढाईत निकराचा लढा देत असताना कर्णसिंह घोरपडे दुसरे हे धारातीर्थी पडले. त्यामुळे विजयनगरचे संपन्न खजिना लुटून जाळपोळ करून मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आले. कर्णसिंहाचा पराक्रम पाहून आदिलशाहाने कर्णसिंहाचा पुत्र चोलराज यांना सप्तहजारी मनसब व तोरगल परगण्यातील काही गावांची जहागीर दिली.

**पिलाजी आणि वल्लभजी घोरपडे**

चोलराजा यांना पिलाजी, कानोजी व वल्लभजी हे तीन मुले होती. हे तिन्ही आदिलशाहीमध्ये सरदार या पदावर कार्यरत होती. पुढे पिलाजी घोरपडे यांना मुधोळ प्रांताची देशमुखी आल्यामुळे ते मुधोळ येथेच स्थायिक झाले. त्यांना ‘सातकस’ नावानेसुद्धा ओळखले जाते. वल्लभजीला वाई परगण्यातील ‘विटे’ प्रांताची देशमुखी आल्यामुळे ते वाई येथे स्थायिक झाले. वाई महाराष्ट्रातील ठिकाण असून त्यांना ‘कापशीकर किंवा नवकस’ घराणे म्हणून ओळखले जाते. एकंदरीत ‘भाळवणी’ हे वल्लभजी घोरपडेंच्या जहागिरीचे मुख्य ठिकाण बनले होते. भाळवणीमधे आजही घोरपडेंचा जुना वाडा जीर्णावस्थेत असलेला दिसून येतो. पुढे मुधोळ व भाळवणी शाखेमध्ये वाटणीसाठी अधूनमधून संघर्ष होण्यास सुरूवात झाली. यावेळी विजापूर आदिलशाहीत सरदारांचे दोन गट होते. एका गटात रुस्तमेजमान, रणदुल्लाखान, शहाजीराजे आणि वल्लभजी होते. तर दुसऱ्या सरदारांच्या गटात खवासखान, अफजलखान आणि पिलाजी घोरपडे होते. यावेळी वल्लभजी विजापूरच्या आदिलशाहीच्या ५०० सैनिकांचे सरदार होते. शहाजीराजे भोसले आणि वल्लभजी घोरपडे हे एकाच आदिलशाहीमध्ये असल्यामुळे शहाजी नेहमी वल्लभजींची बाजू घेत असत.

**म्हाळोजी घोरपडे**

घोरपडे घराण्याचे प्रथम पुरुष म्हाळोजी घोरपडे होते. म्हाळोजी घोरपडे हे छत्रपती शिवाजी महाराजाचे वडील शहाजीराजे यांना समकालीन होते. म्हाळोजी हे विजापूर बादशहाच्या दरबारात सरदार होते. म्हाळोजीच्या अष्टपैलू पराक्रमामुळे बादशहा चक्रीत झाले. त्यामुळे म्हाळोजीस १६३६ साली बादशाहाने देशमुखी बहाल केली. १६३५ नंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्या कार्यास सुरूवात केली. त्यावेळी स्वराज्याच्या उभारणीत म्हाळोजी घोरपडे यांनी शिवाजी महाराजांना साथ देण्यासाठी विडा उचलला. त्याप्रमाणे स्वराज्याची स्थापना झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांना शेवटपर्यंत साथ दिली.

**मालोजी घोरपडे**

म्हाळोजी घोरपडेंना संताजी, बहिर्जी आणि मालोजी ही तीन मुले होती. या तिन्ही मुलांनी वेगवेगळी आपली देशमुखी स्थापन केली होती. यामध्ये कापशी या ठिकाणी संताजी घोरपडे, कर्नाटकातील गजेंद्रगड येथे बहिर्जी आणि दत्तवाड येथे मालोजी यांनी आपापली देशमुखी स्थापन केली होती. मालोजीने छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्याची कमान सांभाळणाऱ्या छत्रपती राजाराम महाराजांना जिंजी किल्ल्यावर सुखरूपपणे पोहोचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. मालोजीच्या या शौर्यामुळे राजाराम महाराजांनी त्यांचा यथोचित सत्कार करण्यासाठी ‘अमीर- उल-उमराव’ हा किताब देऊन गौरव केला.

**बहिर्जी घोरपडे**

म्हालोजीचे तिन्हे मुले त्यांच्या सोबत सैन्यात काम केली होती. बहिर्जींनी घोरपडे यांनी हिंदुराव घोरपडे घराण्याची स्थापना केली. त्यांच्याकडे गजेंद्रगडाची जहागिरी होती. बहिर्जी घोरपडे यांना तीन मुले होती. यामध्ये सयाजद, मुराराव व सिधोजी. यापैकी सिधोजी हा अत्यंत पराक्रमी असून त्यांनी कोल्हापूरच्या ताराराणी बाईसाहेबांना स्वराज्याची गादी स्थापन करण्यासाठी सहकार्य केले. बहिर्जींनी गुत्ती व सोंडूर कर्नाटक परगण्यातील गावे जिंकून घेतली. बहिर्जीकडे घोरपडे यांच्याकडे पायदळ कवायती फौज होती. स्वराज्याच्या संदर्भात ताराबाई यांच्याकडून बहिर्जींना अनेकवेळा करार किंवा इतर महत्त्वाच्या कामासाठी पाठविले जात होते. राजाराम महाराजांनी बहिर्जींना त्यांच्या कार्यावर खूश होऊन 'हिंदुराव' ही पदवी दिली. अशा या पराक्रमी घोरपडे घराण्याचा विस्तार कापशी, मुधोळ, दत्तवाड, बेडग एवढेच नाही तर कर्नाटकातील गजेंद्रगड पर्यंत झाला होता. घोरपडे घराण्यांनी पूर्वजाच्या शौर्याचा वारसा प्रभाविपणे चालविला. समकालीन स्थितीमध्ये सोंडूर संस्थांनच्या झेंड्यावर घोरपडीचे चित्र दिसून येते.

**संताजी घोरपडे**

म्हाळोजी घोरपडेंच्या पुत्रापैंकी यापैकी संताजी सर्वात मोठे ,बहिर्जी मदवे आणि मालोजी धाकटे होते. क्षात्रपरंपरा व क्षात्रतेज लाभलेल्या घोरपडे घराण्यात सेनापती संताजी घोरपडे यांचा जन्म झाला होता. संताजीच्या जन्मा विषयी कुठेही ज्ञात पुरावा दिसून येत नाही. असे असले तरी इ. स. १६४५ साली त्यांचा जन्म झाल्याचे तर्क लावले जातात. कारण या सुमारास छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. या महान कार्यात संताजीचे वडील म्हाळोजी घोरपडेही सहभागी होते. यावरून स्वराज्यनिष्ठेचे व स्वातंत्र्यप्रेमाचे उदात्त संस्कार संताजीवर बालपणीच झाले होते. संताजी घोरपडेच्या कार्याचे प्रामुख्याने दोन भागात विभाजन करणे महत्त्वाचे आहे. पहिला कालखंड म्हणजे संताजीची छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या कारकिर्दीतील कामगिरी. दुसरा कालखंड म्हणजे छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीतील सेनापती संताजी घोरपडे यांची कामगिरी. पहिल्या कालखंडात संताजीच्या कार्याचा उल्लेख फार कमी दिसून येतो. यांचे कारण म्हणजे संताजी घोरपडेच्या जघडणडणीचा कालखंड तर दुसरी बाब म्हणजे या काळातील संसाधनाची कमतरता होय.

**राणोजी व पिराजी घोरपडे**

संताजी घोरपडेंना राणोजी व पिराजी हे दोन मुले होती. राणोजी हे थोरले होते तर पिराजी हे धाकटे होते. राणोजी घोरपडे हे मराठा साम्राज्याचे महान सेनापती संताजी घोरपडे यांचे पुत्र होते. त्यांनी दक्षिण भारतात पराक्रम गाजवला आणि वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांनी घोरपडे घराण्याची लष्करी परंपरा पुढे चालवली. राणोजीने दक्षिणेकडील मोहिमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आणि मराठा साम्राज्याचे नाव उज्ज्वल केले. राणोजीने आपल्या वडिलांप्रमाणेच युद्धभूमीवर शौर्य दाखवले. तसेच कुटुंबाची आणि वारसाची जबाबदारी राणोजीने सांभाळली.

**सारांश**

घोरपडे आणि भोसले हे दोन्ही घराणे मुळात एकच आहेत. या घराण्यातील प्रथम पुरूष हा लक्ष्मणसिंह म्हणजेच मेवाडचे महाराणा हे होते. राजस्थानमधील उदयपूरच्या 'सिसोदे' घराण्यातील म्हणजेच अजयसिंह यांचे पूत्र सुजनसिंह राणा हे १३३४ साली महाराष्ट्रात औरंगाबाद जवळील देवगिरी परगण्यात आले. हे घराणे शूरवीर व पराक्रमी असल्यामुळे सुजनसिंह यांचे नातू भैरवसिंह ऊर्फ भोसाजी यांना बहामनी सल्तनतीकडून १३९८ साली मुधोळ प्रांतातील ८४ गावांसह वंशपरंपरेने जहागिरी मिळाली. 'भैरवसिंह' यांना 'भोसाजी' म्हटले जात होते. भोसाजीचे पुढे भोसले असे नामकरण झाले, तेव्हापासून सिंह ऐवजी भोसले घराणे म्हणून ओळखले जावू लागले. भैरवसिंहाचे पूत्र राणा देवराज यांना राणा उग्रसेन व प्रतापसिंह असे दोन पूत्र होते. राणा उग्रसेन यांना राणा कर्णसिंह आणि शुभकृष्णसिंह असे दोन लढवये पुत्र होते. हे दोन्ही बंधू बहामनी सल्तनतीत सरदार होते. पुढे राणा कर्णसिंह आणि शुभकृष्णसिंह या दोन्ही बंधूच्या दोन शाखा निर्माण झाल्या. राणा कर्णसिंह म्हणजेच घोरपडे घराणे तर शुभकृष्णसिंह म्हणजे भोसले घराणे म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण झाली. सेनापती संताजी घोरपडे यांना राणोजी व पिराजी हे दोन पूत्र झाले. भोसले आणि घोरपडे घराणे मुळात एकच आहेत. तसेच घोरपडे घराण्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली दिसून येते.

**संदर्भग्रंथ सूची**

१. पवार जयसिंगराव, सेनापती संताजी घोरपडे, मराठीदेशा फाउंडेशन, कल्पतरू हार्मनी, वाकड पुणे, तृतीयावृत्ती,
२. Kulka S. L., 1983, The rise and fall of the maratha power, S.B. Deo, Deccan college Pune,
३. घोरपडे बा. बा. राजे, १९८९, घोरपडे घराण्याचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती
४. Apate B. K., 1973, A history of the Maratha navy and merchantship, state board ofr literature and cultural, Mumbai
५. गायकवाड खं. आ., १९७१, करवीर सरदारांच्या कैफियती, खं, आ. गायकवाड, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती,
६. वर्टीकर श. ह., (संपादित), १९७७, कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे, कोल्हापूर
७. आपटे, द. वी., १९३४, मुधोळ संस्थानाच्या घोरपडे घराण्याचा इतिहास, आर्यभूषण प्रकाशन, पुणे
८. सरदेसाई गो.स., १९७५, मराठी रियासत स्थिरबुध्दी राजाराम, खंड १, भाग ५, केशव प्रकाशन भिकाजी ढवळे, मुंबई, द्वितीय आवृत्ती,
९. Gorden Stewort, 1993, The Marathas, 1600-1818, Foundation Books, New Delhi, p.153
१०. आगलावे प्रदीप, २०००, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन नागपूर, द्वितीयावृत्ती